दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२४० शनिवार,दि.०३ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-240 | Saturday, Dt.03 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## ह.भ.प.अतुलशास्त्री महाराज यांची नागऱ्याचीवाडी येथे श्रीमद् भागवत कथा

प्रतिनिधी @ बीड

शिरूर कासार तालुक्यातील मौजे नागऱ्याचीवाडी येथे शुक्रवार दिनांक ०२ एप्रिल ते ०९ एप्रिल २०२५ पासुन तागडगाव येथील संत भगवानबाबा संस्थानचे महंत तथा श्रीमद भागवत कथाकार रामायणाचार्य ह.भ.प. अतुलशास्त्री महाराज यांच्या श्रीमद भागवत कथा ज्ञान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नागऱ्याचीवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या सदरील भव्य दिव्य भागवत कथा सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. कथेची दुपारी २.०० ते ५.०० या वेळात आयोजित करण्यात आली आहे. गौरव झुंजे, पैठण, कृष्णा महाराज पाटील, अविनाश म. पाटील, कृष्णा महाराज सानप हे साथ संगत करणार आहेत.सदरील भागवत कथेचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाकिस्तान बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या चाचणीच्या तयारीत; भारताला चिथावणी देण्याचा निष्काळजी प्रयत्न

**नवी दिल्ली : पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद्यांना ठेचा, बदला घ्या, पाकिस्तानची कायमची अद्दल घडवा, अशी मागणी भारतभरातून होत आहे. काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरोधात लष्कराच्या मोठ्या कारवाया सुरु आहेतच, मात्र दहशतवाद्यांचे आका सीमापार पाकिस्तानात आहेत. त्यांना धडा शिकवण्याची तयारी सुरु झालीय. भारताच्या या भूमिकेनंतर पाकिस्तानला धडकी भरल्याचे दिसून येतंय. या आठवड्यात जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी करण्याच्या तयारीत पाकिस्तान असल्याची माहिती विशेष सूत्रांकडून मिळत आहे. भारताला चिथावणी देण्याचा निष्काळजी प्रयत्न पाकिस्तानकडून करण्यात येत आहे.**

पाकिस्तान या आठवड्यात जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी घेण्याची तयारी करत असल्याचे कळतंय. हे पाकचं चिथावणी देण्याचे एक निष्काळजी कृत्य असून ही भारताविरुद्ध अत्यंत धोकादायक मोहीम असल्याचं समजतं. विशेष सूत्रांकडून ही माहिती मिळत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून, पाकिस्तानने बेफिकीरपणे नौदलाचे इशारे दिले आहेत. अरबी समुद्रात सराव वाढवला आहे आणि नियंत्रण रेषेवर सतत युद्धबंदीचे उल्लंघन केले आहे. अशा अस्थिर परिस्थितीत ही नियोजित क्षेपणास्त्र चाचणी ही उघड चिथावणी आहे आणि भारतासोबत तणाव वाढवण्याचा एक हताश प्रयत्न असल्याचे बोललं जात आहे.



पाकिस्तान बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या चाचणीच्या तयारीत

### युद्धभयानं कापलेल्या पाकिस्तानला चीनची मदत–

युद्धभयानं कापलेल्या पाकिस्तानला चीन मदत करत आहे. चीन ४० रणगाड्यांची पहिली खेप कराचीला पाठवणार आहे. सध्या भारताकडं ४ हजार २००, तर पाकिस्तानकडे २ हजार ६०० रणगाडे आहेत.

### पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचाच हात–

पहलगाममधल्या पर्यटकांवरच्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचाच हात आहे, हे तेव्हाच लक्षात आले. आता याचे धडधडीत पुरावेसुद्धा समोर आलेत. हल्ल्याचा तपास करणाऱ्या एनआयएच्या प्राथमिक अहवालात मोठा खुलासा समोर आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार हल्ल्यामागे पाकिस्तानी लष्कर, आयएसआय आणि लष्कर ए तोयबाचा हात आहे. या हल्ल्याचा कट थेट पाकिस्तानी लष्कर ए तोयबाच्या मुख्य ऑफिसमध्ये शिजल्याची माहिती समोर येत आहे.

### पाकव्याप्त काश्मीरमध्ये हमासची एन्ट्री–

५ फेब्रुवारी २०२५ रोजी हमासने पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मध्ये लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदसह एका रॅलीत भाग घेतला होता. या रॅलीला 'काश्मीर सॉलिडॅरिटी अँड हमास ऑपरेशन अल-अक्सा फ्लड कॉन्फरन्स' असे नाव देण्यात आले. पहलगाम हल्ल्याच्या नियोजनात सहभागी असलेले दहशतवादी या कार्यक्रमाला उपस्थित होते, अशी माहिती देखील मिळत आहे. या कार्यक्रमात हमासचे प्रतिनिधी डॉ. खालेद अल-कदौमी यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. इतर अनेक पॅलेस्टिनी दहशतवाद्यांसह पाकिस्तान समर्थित जिहादी संघटनांनी त्यात भाग घेतला. यावेळी, व्यासपीठावरून भारताविरुद्ध धमक्या देण्यात आल्या.

# धारूरमधे गुटखा विक्रीवर पोलीसांची धाड

## दोन पोते गुटखा ताब्यात

प्रतिनिधी @ धारूर

धारूर येथील बस स्थानक परिसरामध्ये गुटखा विक्री करणाऱ्या एका किराणा दुकानांमध्ये पोलिसांनी धाड टाकून २४ हजार ५५० रुपये किमतीचा गुटखा पकडला .याप्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

धारूर शहरात मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री खुल्या प्रमाणे होत आहे .पोलिसांनी बस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या खानावळ येथे एका किराना दुकानांमध्ये २००० च्या



जवळपास गुटख्याच्या पुढ्या व तंबाखूजन्य पदार्थ सिगारेट आधी साहित्य शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आढळून आले

(उर्वरीत पान २ वर)

# पशूसंवर्धन खात्याच्या माध्यमातून ग्रामीण तरुणांना उद्योजक बनवायचयं

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत परळीत प्रथमच पशुपालकांची एकदिवसीय कार्यशाळा ; योजनेच्या पोर्टलचेही केले उदघाटन

प्रतिनिधी @ परळी

पशूसंवर्धन विभागामार्फत पशूपालन आणि शेतीशी निगडित अनेक चांगल्या योजना राबविल्या जात आहेत. विभागांतर्गत सुरु असलेल्या योजनांतून ग्रामीण भागातील तरुणांना उद्योजक आणि लखपती बनवायचे आहे. तरुणांना स्वावलंबी बनवणाऱ्या वेगवेगळ्या योजना राबवून 'ग्रामीण उद्योजक' अशी ओळख जिल्ह्यातील तरुणांना मिळवून देऊ असा विश्वास राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे व्यक्त केला.महाराष्ट्र शासनाच्या पशूसंवर्धन विभाग आणि राष्ट्रीय पशूधन अभियातंर्गत शहरात प्रथमच आज पशूपालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी जिल्ह्यातील पशू पालकांशी संवाद साधताना उदघाटन पर भाषणात ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. पशूसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पशुसंवर्धनचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे, जि.प. चे अतिरिक्त सीईओ वासुदेव सोळंके, प्रादेशिक सह आयुक्त गणेश देशपांडे,








### पशूपालनांशी निगडित उद्योगांना शेतीचा दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील ; ना. पंकजाताईंचा पशू पालकांशी संवाद

(उर्वरीत पान २ वर)



बीड – महाराष्ट्र राज्याचे उद्योग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नातू इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस मुख्यालय बीड येथे शासकीय मुख्य ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर त्यांचे बीड नगरीमध्ये दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने स्वागत करताना संपादक तथा प्रदेश संपर्कप्रमुख वैभव जगदेवी विवेक स्वामी.

# वाढत्या तापमानामुळे आणि मानवी चुकांमुळे बीड जिल्ह्यात वनविभागात आगीच्या घटनात वाढ

## आगीच्या घटना रोखण्यात वनविभागाला अपयश:– डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी @ बीड

जिल्ह्यात यंदा कडाक्याचा उन्हाळा जाणवत असुन दिवसाचे तापमान ४३ अंतापर्यंत पोहोचले आहे. तापमानात वाढ झाल्याने जमिन तापु लागली आहे.वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा नष्ट होऊन गवत वाळले आहे.झाडांची पाने सुकुन खाली पडली आहेत त्यामुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे.

त्यामुळे वनविभागात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी मानवी चुकांमुळे पावसाळ्याच्या दिवसांत गवत व चारा चांगला येण्यासाठी नागरीकांकडुन गुपचूप हा पालापाचोळा पेटवून दिला जातो.ही आग पुढे जाऊन वनपरिक्षेत्रात पोहोचल्याने तेथील वनसंपत्ती, वन्यप्राण्यांना याची झळ बसते.यातुन वणवा पेटुन वनविभागाचे मोठे नुकसान होते.वनविभाग आगीच्या घटनांना नियंत्रणात आणण्यासाठी शिताफीचे प्रयत्न करताना दिसत आहे.आग लागण्याची शक्यता टाळण्यासाठी वनविभागाची जागृती मोहीम, नागरीकांना सावध करणे,आग प्रतिबंधक उपाययोजना तोकड्या पडत





(उर्वरीत पान २ वर)

# कामगार दिनाच्या दिवशी मजूरांच्या वाहनाचा अपघात

## मजूरांवर कोसळला दु:खाचा डोंगर

प्रतिनिधी @ आष्टी

धामणगाव कडून कडा येथे येत असलेल्या महिंद्रा पिकप या वाहनाचा अपघात होऊन तीन जण जागीच मृत्युमुखी पडले तर सुमारे २० जण जखमी झाले आहेत. धामणगाव येथून जवळच असलेल्या वंजारवाडी या गावातील मजूर धामणगाव मार्गे कडा येथे कांदा भरण्यासाठी येत असताना महेंद्र पिकप हे वाहन देवी निमगाव जवळ रस्त्याच्या खाली जाऊन धडकले. यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर सुमारे २० जण जखमी

(उर्वरीत पान २ वर)



# पाणी पेटलं! तहानलेल्या गावांसाठी घाटगे पाटलांचा एल्गार, अधिकाऱ्यांची बोलती बंद!

## गोदावरी नदीवरील कॅनॉल दरवाजे उघडून शेतकऱ्यांसाठी सोडले पाणी



प्रतिनिधी @ अंबड

जायकवाडीच्या पाण्यावरून पेटलेल्या असंतोषाचा ज्वालामुखी शुक्रवारी उसळला! समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांनी तहानलेल्या गावांसाठी आक्रमक भूमिका घेत थेट गोदावरी नदीच्या कॅनॉलचे दरवाजे उघडले. शेकडो शेतकऱ्यांच्या साथीनं घाटगे पाटलांनी गुळज आणि तळनेवाडी येथील कॅनॉलचे अडथळे झुगारून लावले आणि हक्काचं पाणी गोदावरीच्या पात्रात सोडलं.

अंबड-घनसावंगी तालुक्यात भीषण पाणीटंचाई असताना, पिण्याच्या पाण्यासाठी आणि मुक्या जनावरांसाठी त्राहिमाम असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी मात्र डोळेझाक करत होते. जायकवाडी धरणात पुरेसा साठा असूनही गोदाकाठच्या गावांना कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात चालढकल केली जात होती. या प्रशासकीय उदासिनतेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता.

अखेरीस, सतीश घाटगे पाटील यांनी या असंतोषाचं नेतृत्व करत थेट मैदानात उतरण्याचा

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# परळीत ब्राह्मण सभा आयोजित शानदार सोहळ्यात
# २० बटुंवरसामुदायिक उपनयनसंस्कार!

## सात्विक समाज निर्मितीसाठी धर्मसंस्कार हाच जीवनाचा पाया : ना.पंकजाताई मुंडे
## अविरत ४५ वर्षांचा ब्राह्मण सभेचा उपक्रम कौतुकास्पद– आ.धनंजय मुंडे

प्रतिनिधी @ परळी

धर्माचरणाचे संस्कार हे उपनयनासारख्या संस्कारातून होतात. धर्माचरण व नैष्ठिक आचारासाठी उपनयन संस्कार गरजेचा असल्याचे प.पु.मकरंद महाराज यांनी सांगितले. धर्मशील समाज निर्मितीसाठीउपनयन संस्कार आवश्यक असल्याचे भागवतमर्मज्ञ ह. भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांनी सांगितले. तसेच धर्मसंस्कार हाच जीवनाचा पाया असतो असे ना.पंकजाताई मुंडे यांनी तर परळीत अविरत ४५ वर्षांचा ब्राह्मण सभेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे आ.धनंजय मुंडे यांनी सांगितले.ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वैजनाथ आयोजित शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २० बटुंवरसामुदायिक उपनयनसंस्कार करण्यात आले.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने आयोजित ४५ वासामुदायिक उपनयनसंस्कार सोहळा आज २ मे रोजी शानदार व वैभवी स्वरूपात संपन्न झाला. शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २० बटुंवरसामुदायिक उपनयनसंस्कार करण्यात आले. सकाळी १०.३० वा. प्रवचनमंडप वैद्यनाथ मंदिर परळी वै. येथे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात व विधीपुर्वक हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचे पौरोहित्य मनोहर देव जोशी व ब्रह्मवृंदांनी केले.या वेळी दत्तधाम परभणीचे पिठाधिपती प.पु. मकरंद महाराज, प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांचे अशिर्वचन झाले. या सोहळ्यासाठी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे ,आ.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संत -महंत, विद्वतजन, राजकीय - सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व समाज बांधवांची सोहळ्यासाठी मोठी उपस्थितीलाभली.

धर्मसंस्कार जीवनाचा पाया असुन हे संस्कार करणारा ब्राह्मण सभेचा उपक्रम अविरत ४५ वर्षांपासुन सुरु ठेवणे हे कौतुकास्पद असुन परळीतील सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात उपस्थित राहण्याच्या लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या या परंपरेत मला उपस्थित राहता आले हे आनंददायी असल्याची भावना ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.तर या उपक्रमाला आपण अनेक वर्षापासून दरवर्षी उपस्थित राहत असतो. ब्राह्मण समाज हा आशिर्वाद प्रदान करणारा असुन उपनयन संस्कार सोहळ्याचा अविरत ४५ वर्षापासूनचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे आ.धनंजय मुंडे यांनी सांगितले.

हा सोहळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.सकाळी मातृका पुजनानंतर सर्व बटूंची प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे शोभायात्रा काढण्यात आली. सनई चौघडा, मंत्रोच्चार व समाज बांधवांची मोठी उपस्थिती यामुळे मंदिर परिसर दणाणून गेला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्य शंकराचार्य जयंती साजरी करण्यात आली.मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व आद्य शंकराचार्य यांचे पूजन करण्यात आले.ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले. समारंभाचे सूत्रसंचालन प्रा.रविंद्र जोशी,अजय जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन जितेंद्र नव्हाडे यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ब्राह्मण बहुद्देशीय सभा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

ब्राह्मण सभेच्या विठ्ठल रुक्मीणी मंदिर उर्वरित विकास कामांसाठी २० लक्ष रु.निधी - ना.पंकजाताई मुंडे

दरम्यान या सोहळ्याच्या अनुषंगाने मंत्री पंकजाताई मुंडे यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली.परळी वैजनाथ येथे ब्राह्मण बहुउद्देशीय सभेच्या वतीने जिर्णोद्धार करण्यात आलेल्या विठ्ठल रुक्मीणी मंदिर व स्व. मनोहरपत बडवे सभागहाच्या उर्वरित विविध विकास कामांसाठी आमदार निधीतून २० लक्ष रु.निधी देण्याची घोषणा ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी केली.



## विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक बोंडगे यांचा सेवापुर्ती सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी



आष्टी तालुक्यातील डोंगरगण येथील जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी प्रिय आणि मनमिळावू स्वभावाचे मुख्याध्यापक सुनील बोंडगे यांच्या सेवापुर्तीचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी प्रमुख पाहुणे व सत्कार मुर्तींना विद्यार्थी व ग्रामस्थांनी वाजत गाजत स्वागत करीत व्यासपीठावर आणले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच माऊली वाघ हे होते.

याप्रसंगी जि. प. सदस्य देविदास धस, उद्योजक आण्णासाहेब चौधरी, युवा नेते जयदत्त भैया धस, यश भैय्या आजबे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, विस्तार अधिकारी अर्जुनराव गुंड, उपशिक्षणाधिकारी संजयकुमार सरवदे, विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे सचिव महेशकुमार शिंदे, संचालक नितीन करडुळे, गोरक्ष गोरे, पोपट बोराडे, आदिनाथ गव्हाणे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख सुरेश मिरगणे, माजी मुख्याध्यापक महादेव टकले, माजी उपसरपंच परमेश्वर कर्डीले, माजी सरपंच संपत कर्डीले, मुख्याध्यापक अर्जुन पाचारणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब शिंदे, बुचुडे, उपाध्यक्ष सौ. अर्चना माळवे, उपाध्यक्ष सौ. पायल झाडमुथा, शिवनाथ शेंडे (फौजी) यांच्यासह कडा केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरासह बोंडगे यांचे नातेवाईक आणि मित्र परिवार उपस्थित होते.

यावेळी डोंगरगण ग्रामस्थ, शाळा तसेच मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक सुनील बोंडगे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आदर्श शिक्षक देविदास भवर यांनी केले व उपस्थितांचे आभार आदर्श स्काऊट मास्टर शिवाजी कोल्हे यांनी मानले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मुख्याध्यापक सुनिल बोंडगे यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला व आपल्या भाषणातून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जल व्यवस्थापन कृती पंधरवाड्यात आष्टी उपविभागाला विजय पाखरे मुळे बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक

प्रतिनिधी @ आष्टी

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने नामदार जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जल व्यवस्थापनाची चळवळ लोकचळवळ व्हावी तसेच जलसाक्षरता निर्माण व्हावी, यासाठी जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यभर जलसंपदा विभाग यांनी राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये जल व्यवस्थापनावरील पंधरा दिवस विविध उपक्रम राबवले गेले. जलसाक्षरता ही लोकचळवळ उभी राहावी यासाठी जल व्यवस्थापनाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोचवण्यात आले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तालुक्यांची निवड करून त्यांचा सन्मान व गौरव करण्यासाठी ३० एप्रिल २०२५ रोजी बीड येथील हॉटेल यशोदा येथे पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे विशेष अतिथी चंद्रकांत शेळके (तहसीलदार, बीड), अध्यक्ष श्रीमती पल्लवी जगताप (पालक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड), प्रमुख वक्ते प्रा. डॉ. राम बोडखे व मधुकर वाघ सर हे होते. कार्यक्रमास सुरेश पवार, जयंत इनामदार व विनायक नखाते व बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यामधील जलसंपदा विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा उपक्रमात आष्टी उपविभागाने उत्कृष्ट कार्य करून बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. हा मान मिळवण्यासाठी विजय पाखरे (उपविभागीय अधिकारी), ओम डोके (शाखाधिकारी), ज्ञानेश्वर देशमुख (शाखाधिकारी) आणि आष्टीच्या संपूर्ण जलसंपदा विभागाच्या टीमने अथक मेहनत घेतली. सलग पंधरा दिवस विविध उपक्रम व जनजागृती मोहिमा राबवून जल व्यवस्थापनाला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. त्यामुळेच आष्टी तालुक्याला हे प्रथम पारितोषिक मिळाले आहे. जशा स्वरूपाची आर. आर. आबांनी ग्राम स्वच्छता अभियानाची चळवळ राबवली होती. अशीच चळवळ जल संपदा विभागामार्फत ना. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे जल व्यवस्थापनाच्या बाबत महाराष्ट्रात राबवण्याचा महाराष्ट्रात प्रयत्न करत असून

## सामाजिक कार्यकर्ते विनोद रोडे यांनी हजारो लोकांना केले अन्नदान
### मोठमोठ्या पदाधिकाऱ्यांनी वाढपे म्हणून केले श्रमदान

प्रतिनिधी @ आष्टी

शिराळ ता. आष्टी, जि. बीड येथील मूळ रहिवासी असलेले व हल्ली मुक्काम खासबाग, आष्टी, जि. बीड येथे वास्तव्यास असलेले तसेच आ. सुरेश आण्णा धस यांचे कट्टर समर्थक विनोद (नाना) रोडे यांनी शिराळ, ता. आष्टी, जि. बीड येथे गुरुवार दिनांक १ मे २०२५ रोजी आयोजित केलेल्या कौटुंबिक जागरण गोंधळाच्या निमित्ताने आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील अनेक नातेवाईक, मित्रपरिवार व शैक्षणिक, धार्मिक, राजकीय व साहित्य क्षेत्रातील अनेक व्यक्तींना निमंत्रित केले होते.

सायंकाळी सात वाजल्या नंतर सर्व निमंत्रित व्यक्तींना त्यांच्या शिराळ येथील निवासस्थानाच्या जवळील



सभागृहात शुद्ध शाकाहारी सुरुची भोजनाची (उंबर भाजी, भाकरी, भात, गुलाबजामुन, कांदा, लिंबू, पाण्याची बाटल) व्यवस्था करण्यात आली होती. याप्रसंगी विशेष बाब म्हणजे या भोजनाच्या पंगतीमध्ये मोठमोठ्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या पदाधिकारी व्यक्तींनी वाढपे म्हणून हक्कांनी श्रमदान करून सर्व व्यक्तींना पंगतीमध्ये भोजन वाढण्याची चोख व्यवस्था केलेली दिसून आली.

अन्नदान हे श्रेष्ठदान समजून उपस्थित राहिलेल्या हजारो लोकांनी या शुद्ध शाकाहारी सुरुची भोजनाचा चांगल्याप्रकारे आस्वाद घेतला. भोजन घेतल्यानंतर प्रत्येकाच्या तोंडी खुपच अप्रतिम भोजन दिले याचे कौतुक होत होते. यावेळी स्वतः विनोद (नाना) रोडे प्रत्येक निमंत्रित व्यक्तींचे शाहीथाट व कसल्याही प्रकारचा बढेजाव न करता आदरतिथ्य करत होते. खऱ्याअर्थाने विनोद रोडे हे गरीब परिस्थितीतून पुढे आलेले एक गुणी नेतृत्व आहे. त्यांच्या वागण्या, बोलण्यात कधीही मी पणा, गर्व किंवा मोठेपणा जाणवत नाही. नेहमी हसतमुख व इतरांना मदत करण्याची त्यांची दानत आहे. या सर्व गोष्टींमुळेच हजारो लोकांनी त्यांच्या जागरण गोंधळाला भेट देवून सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

### आमदार सुरेश धस यांच्या आदर्शावर चालत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांचा
## सामाजिक जाणीवेचा निर्णय वाढदिवस न साजरा करुन दिला संवेदनशीलतेचा संदेश

प्रतिनिधी @ पाटोदा

राजकारणात सत्ता, प्रसिद्धी आणि मोठ्या कार्यक्रमांची चढाओढ असतानाही काही लोक आपल्या कृतीतून समाजाशी असलेली नाळ जपतात. याचाच प्रत्यय आला पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी घेतलेल्या एक महत्त्वपूर्ण निर्णयातून. आपले नेते, विधानसभेतील आमदार सुरेश आण्णा धस यांनी अलीकडेच सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या व इतर गंभीर सामाजिक कारणांमुळे आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला.त्यांच्याच आदर्शाचा आणि विचारसरणीचा आदर राखत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनीही १ मे रोजी असलेला आपला वाढदिवस यंदा साजरा केला नाही.राजू भैय्यांनी हा निर्णय एका अथांग संवेदनशीलतेतून घेतला. स्व. सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या, पहलगाम येथे अलीकडेच झालेल्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचा गेलेला बळी, आणि त्यांच्या प्रभागातील 'कुटुंबातील'सदस्या प्रमाणे असलेले बिनवडे व निघाळे यांचे अलीकडेच झालेले निधन, तसेच जिवलग मित्र अमोल नाईकनवरे व खय्युम अध्यक्ष यांचे दुःखद निधन या सर्व घटनांनी त्यांच्या मनावर खोल परिणाम केला.त्याचेच



सामाजिक भान जपत, कोणताही सार्वजनिक कार्यक्रम, जाहिरातबाजी,सत्कार हारतुरे न घेता आपला वाढदिवस साजरा केला नाही.यामुळे आजच्या काळात, जिथे वाढदिवस हे केवळ स्वतःच्या प्रसिद्धीसाठी साधन बनले आहे, तिथे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी दिलेला हा उदाहरणार्थ सामाजिक संदेश सर्वांसाठी खुप प्रेरणादायी ठरणार आहे




## करखेली : 'नुसरत कन्स्ट्रक्शन्स स्कॉलरशिप निवड चाचणी'त गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव

धर्माबाद ( अशोक पडोळे )

जिल्हा परिषद हायस्कूल, करखेली येथे नुसरत कन्स्ट्रक्शन्स स्कॉलरशिप निवड चाचणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नुकतीच पार पडली. या चाचणीत मराठी माध्यमात गायत्री गजानन खांडरे हिने प्रथम क्रमांक मिळवून बाजी मारली, तर राखी रमेश भोगेवार हीने द्वितीय क्रमांक पटकावला. उर्दू माध्यमातून तजामहेरीन उस्मान कुरेशी ही विद्यार्थिनी प्रथम क्रमांकाने यशस्वी झाली.

या गुणवंत विद्यार्थिनींचा विशेष सत्कार नुसरत कन्स्ट्रक्शन्सचे मालक श्री. मोईजोद्दीन सेठ यांच्या हस्ते गावकरी व शाळा प्रशासनाच्या उपस्थितीत करण्यात आला. सत्कारप्रसंगी विद्यार्थिनींना पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तीन लाख रुपये प्रति विद्यार्थी - शिष्यवृत्तीचे स्वरूप

नुसरत कन्स्ट्रक्शन्सतर्फे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अकरावी व बारावी शैक्षणिक वर्गासाठी फी, शहरात निवास व जेवणाचा संपूर्ण खर्च दिला जाणार असून, एकूण अंदाजे प्रति विद्यार्थ्याचा वार्षिक खर्च ३ लाख रुपये आहे. ही योजना फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ साठी लागू असून, जिल्हा परिषद हायस्कूल, करखेली येथे इयत्ता दहावीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीच आरक्षित आहे.

शाळेचे आवाहन - उज्ज्वल भविष्याच्या दिशेने पाऊल टाका

या अद्वितीय संधीचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद हायस्कूल, करखेली येथे प्रवेश घ्यावा, असे आवाहन शाळा प्रशासनाने केले आहे. प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्यावतीने हार्दिक स्वागत करण्यात आले.

## परळी न्यायालयाची नवीन इमारत पर्यावरणपूरक व्हावी - ना. पंकजाताई मुंडे
### न्यायालयाच्या इमारत बांधकामाचे थाटात भूमिपूजन

प्रतिनिधी @ परळी

परळी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची नूतन इमारत पर्यावरणपूरक व्हावी, यासाठी जे काही सहकार्य लागेल ते आपण निश्चितपणे करू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले. इमारतीसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यात यावा. निर्माणाधीन इमारतीवर पाण्याचे रिसायकलिंग करण्याची व्यवस्था असावी. न्यायालयाच्या परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी असेही त्यांनी यावेळी म्हटले.

परळी येथे ४१ कोटी रूपये खर्च करून बाधण्यात येणाऱ्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या कोनशिला समारंभ आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद





यावलकर, बार कौन्सिल महाराष्ट्राचे सदस्य व्ही डी साळुंके, परळीचे दिवाणी न्यायाधीश दिपक बोर्डे, वकील संघाचे अध्यक्ष ड हरिभाऊ गुट्टे आदींसह मान्यवर उपस्थित होते. ना.पंकजाताई मुंडे यावेळी पुढे बोलताना म्हणाल्या, परळी न्यायालयाला नवीन इमारत मिळाली याचा मनस्वी आनंद होतो आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या प्रयत्नाने परळी तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर परळीत न्यायालय सुरू झाले. पुढे २००९ साली मी परळीची आमदार असताना कोर्टाची इमारत इरिगेशन विभागाच्या रेस्ट हाऊसच्या जागेत आणली. तेंव्हापासून सातत्याने आम्ही विकासाच्या प्रश्नांवर काम करत आहोत. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया थांबवणार नसल्याचे त्या म्हणाल्या. राज्य सरकारचा घटक म्हणुन स्वतः पुढाकार घेऊन लोकहिताच्या कामासाठी जे काही करता येईल त्यासाठी पूर्णपणे सहकार्य करणार असल्याचा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

फेक अकाउंटवर कडक कायदा व्हावा

सोशल मीडियात होत असलेल्या वाढत्या गैरप्रकाराबद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी चिंता व्यक्त केली. सोशल मीडियावर फेक अकाऊंटच्या माध्यमातून खोटी माहिती व बनावट ट्रोलिंगचे वाईट प्रकार सुरू आहेत. अशा प्रवृत्ती समाजात वाढत आहेत, यावर कुठेतरी आळा बसला पाहिजे. सोशल मीडियाच्या या गैरवापराविरोधात कडक कायदा करण्याची आवश्यकता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



शनिवार, दि.०३ मे २०२५
SATURDAY, DT.03 MAY 2025



# मंत्री इंद्रनील नाईक यांच्या समवेत सकारात्मक चर्चा - वैभव स्वामी

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्याचे उद्योग तथा सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री, माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे नातू श्री इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते बीडच्या पोलीस मुख्यालयावर महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले.यानंतर मंत्री महोदयांना बीड जिल्ह्यातील उद्योग क्षेत्र आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असलेली वस्तुनिष्ठ माहिती देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव जगदेवी विवेक स्वामी. बीड जिल्ह्याच्या विकासा संदर्भात त्यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त करून सहकार्य



करण्याची भावना स्पष्ट केली.

यावेळी जेष्ठ पत्रकार नारायण नागरे यांच्यासह प्रशासनातील प्रमुख बीडचे नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निष्ठावंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अविनाश नाईकवाडे यासह मान्यवर.

# पोटच्या मुलानेच केला आईचा खून

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे गुरुवारी एक अत्यंत धक्कादायक घटना घडली असुन, घरगुती वादातून एका पोटच्या मुलाने आपल्या वयोवृद्ध आईची निर्दयपणे हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. चोत्राबाई भानुदास सोन्नर असं दुर्दैवी मृत महिलेचं नाव आहे. वयाची सत्तरीपार केलेल्या आईची स्वत:च्या मुलाने हत्या केली.

आईवर जीवघेणा हल्ला..

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुलाची पत्नी काही दिवसांपूर्वी माहेरी गेली होती. त्यानंतर त्याचे घरी आईसोबत किरकोळ कारणांवरून वारंवार खटके उडत होते. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी रात्री दोघांमध्ये मोठं भांडण झाले आणि रागाच्या भरात मुलाने आईवर जीवघेणा हल्ला केला, ज्यात आईचा जागीच मृत्यू झाला.आरोपी मुलाला पोलिसांनी घेतले ताब्यातया घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि आरोपी मुलाला ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी प्राथमिक तपासात सांगितलं की, घरगुती कलहातून ही हत्या झाली असावी. मात्र, यामागील नेमकं कारण आणि अधिक तपशील पोलीस तपासाअंती समोर येईल. या घटनेमुळे संपूर्ण येल्डा गावात आणि परिसरात शोककळा पसरली असून, एका वयोवृद्ध आईची तिच्याच मुलाने केलेली हत्या सर्वांना सुन्न करून गेली आहे.



# जय भवानी कन्या प्रशाला केज मधील सुट्टीतील आनंददायी अभ्यास पुस्तिका

प्रतिनिधी @ केज

जय भवानी कन्या प्रशाला केज ही शाळा राबवत असलेल्या अनेक विविध नाविन्यपूर्ण उपक्रमा मुळे सातत्याने चर्चेत असते दिनांक २ मे २०२५ पासून शासनाच्या वतीने सर्व शाळांना सुट्टया जाहीर करण्यात आल्याआहेत. नैसर्गिक रित्या विद्यार्थ्यांना वाटत असते की,नेहमीच्या रुटीन पासून ब्रेक मिळायला हवा, खेळायला मिळायला हवे तरच सुट्टीची मौज आहे.परंतु पालकांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांच्या लक्षात ही बाब येणे गरजेचे आहे की,विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा टच सुटू नये.एरवी ज्या गोष्टी करावयास जमत नाही उदाहरणार्थ रोजचे लेखन,पाढे म्हणणे व इतर बाबी अशा गोष्टी या कालावधीमध्ये करणे गरजेचे असते. वेळ सत्कारणी लागणे



महत्त्वाचे आहे.यामुळे जयभवानी कन्या शाळा केज ही शाळा दरवर्षी विद्यार्थ्यांनाआनंददायी सुट्टीतील अभ्यास पुस्तिकेचे वाटप करते. शाळेचे इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतचे सर्व वर्ग हे सेमीइंग्रजी माध्यमाचे आहेत.या पुस्तिकेमध्ये विद्यार्थ्यांना हसत खेळत इंग्रजी वाचनाची आवड लागावी,भूगोल सारख्या विषयाचे वेग वेगळे नकाशे मोठ्या आकारात काढून वेग वेगळ्या रंगाने रंगवणे, शुद्धलेखन लिहिणे, आनंददायी वाटतील अशा या गोष्टी पुस्तकां मध्ये समावेश करण्यात आलेले आहेत.सदरील पुस्तिका शाळेतील तज्ञ शिक्षकांनी अत्यंत मेहनतीने व विद्यार्थ्यां मध्ये नवचैतन निर्माण व्हावे अशा प्रकारची बनवली असून त्याचे विद्यार्थी पालकांनी व शिक्षण प्रेमींनी स्वागत केले आहे.सदरील पुस्तिकेचे वाटप शाळेच्या वतीने करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक श्री. देशमुख पी.एम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी सांगितले की,आपली शाळा ही विविध अनेक उपक्रम सातत्याने राबवित आहे त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ प्रत्येक महिन्याला होणाऱ्या छएएढ- गएए सराव परीक्षा,डिजिटल हॉल, हॉलिडे होमवर्क, शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा व इतर अनेक उपक्रमसातत्याने शाळेत चालू असतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा व शाळेतील विद्यार्थी निश्चित घेत आहेत असे मत मांडले.यावेळी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक खुळे के.व्ही यांनी सोप्या पद्धतीने गणित शिकण्याची कला विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.यावेळी शाळेचे शिक्षक श्री. नाईकनवरे ए जी,बचुटे एम.ए,देशमुख व्ही.पी, गिरी एस.एम,श्रीमती पवार एस.एस,श्री. देशमुख पी.आर,शिंदे बी.एम,शोएब सय्यद श्री गिराम बी.एम यांनी परिश्रम घेतले.

# केज नगरपंचायतीच्या वतीने शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणी पुरवठा सुरु

प्रतिनिधी @ केज

केज शहरातील तहानलेल्या शिक्षक कॉलनी भागात आज पासून टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.केज नगरपंचायतला केज शहरातून सर्वाधिक महसूल देणाऱ्या शिक्षक कॉलनी भागात पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे या भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत असते.या वर्षी कडक उन्हाळा पडल्यामुळे या भागातील बोअरवेल पूर्णपणे आटले आहेत. पाण्यासाठी वणवण भटकत पाणी मिळवणे किंवा विकत पाणी घेणे येवढेच पर्याय सद्या या भागातील रहिवासी लोकांच्या नशिबी आले होते.परंतु केज नगर पंचायतीच्या वतीने आज पासून शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्यामुळे या भागातील रहिवासी गटनेते हारुणभाई इनामदार,नगराध्यक्षा सिताताई बनसोड, नगरसेवक बाळासाहेब गाडवे,बालाजी



जाधव व नगरपंचायत विभागाचे आभार मानत आहे.शिक्षक कॉलनी भागातील पत्रकार प्रकाश मुंडे यांचे चिरंजीव राहुल मुंडे यांचे दुर्दैवीअपघाती निधन झाले होते.राहुल मुंडे यांच्या स्मरणार्थ या भागात नव्यानेचस्थापन करण्यात आलेल्या राहुल मुंडे प्रतिष्ठान, युवा नेते खय्युम शेख, पत्रकार प्रकाश मुंडे, पिंटू भैय्या तांदळे,एम. डी घुले सर,अरुण बप्पा धस सर,सुधाकरढाकणे सर,अमोल धस,सोनू धस,रुद्रा तांदळे,रतन वाघमारे व नागरिक तसेच महिला मंडळ यांनी पाण्याची टाकी व पाइपलाइनने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टँकरने पाणी पुरवठा करावा ही मागणी लावून धरली होती ही मागणी मान्य केल्यामुळे गटनेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात बक्षीस वितरण सोहळा संपन्न

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इंग्रजी ग्रामर अँड स्पोकन बॅच चा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला. मागच्या चार महिन्या पासून विद्यार्थ्यांना इंग्रजी चांगली शिकता आली पाहिजे यासाठी इंग्रजी विषयाचे शिक्षक रोकडे एस.व्ही यांनी मनातून प्रयत्न केले. चार महिन्यांमध्ये विविध उपक्रम घेण्यात आले.सदरील उपक्रमांत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती सिंधुताई चव्हाण या होत्या.दि.२८ नोव्हेंबर ते दि.३० एप्रिल या दरम्यान इंग्रजी व्याकरणाच्या बॅचमध्ये जे विद्यार्थी शिकले त्यांच्या साठी विविध स्पर्धांचे आयोजन केले यात प्रामुख्याने निबंध उपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.निबंध स्पर्धेमध्ये प्रथम साक्षी उत्तरेश्वर बावकर,द्वितीय श्रावणी सुधीर काळदाते आणि तृतीय साधना ज्ञानेश्वर सुवर्णकार त्याचबरोबर


इंग्रजी व्याकरणाच्या अंतिम परीक्षेत प्रथम ज्ञानेश्वरी शहाजी रोकडे, द्वितीय जान्हवी संदिपान नरवटे,तृतीय वैभवी सूर्यकांत भालेकर आदर्श इंग्रजी व्याकरणाच्या बॅचचा तिसरा उपक्रम वेगळा होता या उपक्रमामध्ये बेस्ट स्टुडन्टची निवड करण्यात आली यात ठराविक एका एक, दोन,तीन असे क्रमांक काढण्याऐवजीउपस्थित सर्व विद्यार्थ्यांना बेस्ट स्टुडन्ट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी इंग्रजी विषयाचे शिक्षक रोकडे एस.व्ही.यांनी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण,अजय काळे सर यांनी मार्गदर्शन केले.

# अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवुन तिला पळवुन नेवुन तिच्यावर अत्याचार

## २० वर्ष सश्रम कारावास व ५५ हजार रुपये दंडाची शिक्षा

प्रतिनिधी @ केज

दि.१७ जानेवारी २०२२ रोजी पिडीतेला पळवुन नेवुन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी आरोपी शकील महम्मद मुलाणी रा.दुधगाव ता.जि. धाराशिव यास केज येथील मा.सत्र न्यायाधीश १ श्री. कुणाल डी.जाधव साहेब यांनी दोषी ठरवून २० वर्ष सश्रम कारावास व एकुण ५५,००० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.या प्रकरणाची थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हा त्याचा वडापावचा गाडा घेउन धनेगाव फाटा येथे गेला होता व घरी त्याची पत्नी व बहीण पिडीता या दोघीच होत्या.दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादीस फोन करून कळविले की पिडीत हि दुपारी बारा वाजता पाणी आणण्या साठी गेली असुन अद्यापपर्यंत आलेली नाही.तेव्हा फिर्यादीने पिडीतेचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही म्हणुन पिडीत हिस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे अशी फिर्याद दिली.अशा आशयाच्या पिडितेच्या भावाच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन युसुफवडगाव येथे आरोपी विरूध्द कलम ३६३ भादंवी प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरुन तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक एस.के. कोळी आणि पोलीस उपनिरीक्षक व्ही.ए. सारंग यांनी या प्रकरणाचा तपास केला.सदर तपासा दरम्यान पिडीतेचा शोध



घेतला असता पिडीता ही जामगाव येथेआरोपी शकील महम्मद मुलाणी याचे सोबत मिळुन आली.पिडीतेकडे विचारपुस केली असता तिने सांगितले की दि. १७ जानेवारी २०२२ रोजी सदर आरोपी याने पिडीतेस लग्नाचेआमिष दाखवुन तिला कर्नाटक राज्यातील लोकापुर त्यानंतर तेथुन सापटने ता.माढा,जि.सोलापुर येथे विटभट्टीवर तसेच जामगाव ता.बार्शी. जि.सोलापुर येथे विटभट्टीवर नेले व तेथे तिच्या सोबत तिची संमती नसताना शारिरीक संबंध ठेवले. पिडीतेने दिलेल्या जबाबावरून सदर प्रकरणात कलम ३६६,३७६ (२) (एन) भादंवी सह कलम ६,८ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्या प्रमाणे वाढ करण्यात आली. व मा. सत्र न्यायालय केज येथे दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणाची सुनावणी मा.सत्र न्यायाधीश वर्ग-१ श्री.कुणाल डी.जाधव साहेब यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्या साठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०७ साक्षीदार तपासण्यात आले.सदर प्रकरणात पिडीता, फिर्यादी,वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष तसेच सरकार पक्षाचे दाखल केलेले सक्षम पुराव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन करुन व सहायक सरकारी वकील एड. राम बिरंगळ यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा.सत्र न्यायाधीश श्री. कुणाल डी.जाधव साहेब यांनी आरोपी शकील महम्मद मुलाणी रा.दुधगाव ता.जि. धाराशिव यास कलम ६,८ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे २० वर्ष सश्रम कारावास व एकुण ५५,००० रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.सदर प्रकरणात सहायक सरकारी वकिल एड. राम बी.बिरंगळ यांनी काम पाहिले व त्यांना सहायक सरकारी वकिल आर.पी.उदार आणि एड.सचिन चौधरी यांनी सहकार्य केले तसेच त्यांना पैरवी अधिकारी म.पो.ना. आर.आर बनसोडे यांनी सहकार्य केले.

# ६१ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी @ केज

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धेतीलगुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजिलोद्दीन काजी, नारायण अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे स्वयं. अर्थसहायित शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत घाडगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब तिडके, पत्रकार तथा प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर, सेवानिवृत्त शिक्षक डोईफोडे सर,शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.कार्यक्रमाच्या पुढील सत्रात शाळेतील विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती पात्र एकूण ३३,एन एम एम एस शिष्यवृत्तीधारक १४, एमटीएस ऑलंपियाड मधील राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतील एकूण ६१ विद्यार्थी तसेच इयत्ता ५ वी ते ९ वी वर्गातील गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.५ वी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी- वैभवी इतापे,अनुज चाळक, वैष्णवी नागरगोजे, वैष्णवी केदार,ओम मुळे,अनुज शिंदे,शिवम कोरडे,गौरंग मुळे,श्याम तांबवे,शिवांशू मुंडे इत्यादी विद्यार्थ्यांना



सन्मानित करण्यात आले.८ वी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी- हिंदवी यादव,कैवल्य मोरलवार श्रेयश जगदाळे,अक्षरा चव्हाण,पार्थ यादव, आदित्य डोईफोडे,प्रति गवळी,अनुष्का काकडे, सुयश बडे,सत्यानंद खरमाटे,शुभम केदार, जयराज कांबळे,ओम आठरे,सोहम चौरे,शर्वरी मिसाळ,रोहन चाटे, हर्षदा शेळके,स्वराली बारगजे,समर्थ सारूक, श्रेया गुंड,जयंतसौदागर, परेश तांदळे,आरव कांबळे इत्यादी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.एमटीएस ऑलंपियाड राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय गुणवंत विद्यार्थी- हिंदवी यादव राज्यातून दुसरी, कैवल्य मोरलवार जिल्ह्यातून दुसरा, आर्या लटपटे जिल्ह्यातून सहावी तसेच इतर २१ गोल्ड मेडल, ३६ सिल्वर मेडल मिळविलेल्या एकूण ६१ विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.एन एम एम एस तसेच सारथी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी- कैवल्य मोरलवार, जयराज कांबळे, आदित्य डोईफोडे, शिवम घोडके, श्रावणी सपाटे, अनुष्का काकडे, योगेश केदार, सोहम चौरे, साईराज खोडसे, हर्षदा शेळके, गौरी देशमुख, सोहम घाटूळ, रोहित देशमुख, समीक्षा देशमुख इत्यादी.संघर्ष पत्रकार संघ आयोजित शालेय नृत्य स्पर्धेतील विजेता संघ- अपूर्वा सोनवणे, श्रेया धपाटे, संस्कृती गायकवाड, सृष्टी अडसूळ, राजनंदिनी सोनवणे, श्रद्धा काकडे, श्रावणी लोंढे, नंदिनी सपाटे, किशोरी मुळे, श्रुती सावंत, तेजस्विनी कापरे, प्राची ढोबळे इत्यादी.शाळेच्या मंत्रिमंडळातील उत्कृष्ट मंत्री पुरस्कार- इयत्ता सहावीतील विद्यार्थीनी गुंजन घोळवे उत्कृष्ट मुख्यमंत्री तसेच पूर्वा सोनवणे उत्कृष्ट शिक्षणमंत्री. तसेच याप्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शाळेतील सर्व शिक्षकवृंदांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे मुख्याध्यापिका तसेच शिक्षक वृंद यांच्या वतीने सत्कार करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव जी. बी. गदळे बोलताना म्हणाले, या स्पर्धेच्या युगामध्ये पालकांनी देखील विद्यार्थ्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे, कारण केवळ शाळेचा संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक विकास देखील महत्त्वाचा आहे. संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे याप्रसंगी म्हणाले, संस्था ही केवळ संस्थेचे पदाधिकारी अथवा शिक्षक यांच्यावर चालत नाही तर पालक वर्गांचे देखील सहकार्य महत्त्वाचे असते. तेंव्हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिल्ह्यात शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

प्रतिनिधी @ बीड

पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. २ मे रोजी बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करत या सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उदंड प्रतिसाद मिळत असून जिल्ह्यासाठी दिलेले सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला.



लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेल्या शिवसंग्राम 'संघटन सर्वोपरि ' या विचारधारेने कार्य करणाऱ्या संघटनेत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. संघटनशक्तीला बळ देण्यासाठी पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी झोकून देऊन काम करत असल्याबद्दल शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी कौतुक केले. या अभियानासाठी पक्ष संघटना, कार्यकर्ते काम करत आहेत. पुढील महिनाभर हे अभियान राबवणार आहेत. जिल्ह्यात जवळपास ५० हजार सदस्य बनवणार आहेत. या अभियानात युवा, लाडक्या बहिणी, बौध्द समाजात सर्वच समाजाने सहयोग घेतला आहे. असा कोणताही समाज नाही ज्याने शिवसंग्रामने सदस्यता घेतली नाही. मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाजतील लोकांनी सहभाग घेतला आहे, याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलगडे, जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे , रामदास नाईकवाडे, ज्ञानेश्वर कोकाटे, मनोज जाधव ,सुनील शिंदे ,शेख कुतुब भाई, शेख आबेद, संगीता ठोसर, शेषेराव तांबे, सुशील कांबळे, कैलास शेजाळ, विठ्ठलराव ढोकणे, राजेंद्र आमटे , अशोक लोकरे, रायचंद कापसे, देविदास मेंगडे , धर्मराज मागदे, पंडित शेंडगे ,हरीचंद्र ठोसर, गणेश धोंडरे,संदीप नवले, ओकार पाटील, आदी उपस्थित होते.

# जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदेमध्ये मुकेश अंबानी यांनी मांडली भारताच्या नेतृत्वातील जागतिक मनोरंजन विश्वाच्या क्रांतीची कल्पना

प्रतिनिधी @ मुंबई

**भारत केवळ एक देश नाही ती कथांची एक अशी समाजव्यवस्था आहे, जिथे कथात्मक मांडणी ही एक जीवनशैलीच आहे, असे प्रतिपादन रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांनी नुकतेच जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदेतील भाषणात केले.**

कथात्मक मांडणी ही भारतीय जीवनशैलीशी घट्टपणे विणलेली वीण असून, इथल्या महाकाव्यांपासून पौराणिक कथांपर्यंत, कथात्मक मांडणी हा भारताचा वारसा राहिला. आशय हा महत्वपूर्ण असून, चांगल्या कथांना कायमच बाजारपेठेत मोल मिळते. हे कालातीत तत्त्व असून, हेच जागतिक मनोरंजनाचा आधार आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी अंबानी यांनी भारत हा जगाच्या मनोरंजन उद्योग क्षेत्राचे मुख्य केंद्र बनणार असल्याची कल्पना उपस्थितांसमोर मांडली. आपल्या संबोधनातून त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परिवर्तनाची प्रेरणा देणार्या दृष्टिकोनाबाबत प्रशंसा केली तसेच वेव्हज शिखर परिषद ही याच भविष्याच्या दिशेने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊल असल्याचे गौरवोद्गारही काढले.

आपल्या भाषणातून अंबानी यांनी जागतिक संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या क्षेत्रात भारताचा वाढत्या प्रभावावावरही शिक्कामोर्तब केले. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र ही भारताची 'सॉफ्ट पॉवर' अर्थात राजकीय क्षेत्रापलीकडची सांस्कृतिक ताकद असल्याचे लोक म्हणतात, मात्र ही भारताची खरी ताकद असल्याचे आपण मानतो असे त्यांनी सांगितले.

श्री.अंबानी म्हणाले की, आकर्षक आशय मांडणी, गतिमान लोकसंख्याशास्त्र आणि तंत्रज्ञानात्मक नेतृत्व या तीन स्तंभांनी बळकट असलेल्या मनोरंजन क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी देश सज्ज आहे. भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापकतेची कथा नाही तर ती आकांक्षा, महत्त्वाकांक्षा आणि परिवर्तनाची कहाणी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



प्रतिनिधी @ जाफराबाद

कार्यक्रमासाठी कार्यालयाचे प्रमुख श्री.सतीशजी शिंदे साहेब गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जाफ्राबाद, श्री. काळे साहेब शिक्षण विस्तार अधिकारी ,आस्थापना विभागाचे प्रमुख वरिष्ठ लिपिक श्री. ठोसरे साहेब, श्री पंडित साहेब तसेच साधन व्यक्ती , समावेशित तज्ञ, विशेष शिक्षक तसेच कार्यालयीन इतर कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार विभागातील दिव्यांगांशी संवाद

## दिव्यांग बांधवानी सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी @ छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा विभागातील गरजू दिव्यांग यांच्या आज पर्यंत प्रलबिंत असलेल्या मागण्या सोडविण्यासाठी शासन निर्णयाच्या अधिन राहून व दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ बाबत विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे विभागातील दिव्यांगाशी ७ मे २०२५ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधणार आहे. तरी विभागातील दिव्यांगांनी संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दिव्यांग व्यक्तीच्या प्रलंबित मागण्याचे निराकरण करण्याबाबत

# शिरूरचा एकविस वर्षीय युवा बनतोय जैन धर्माचा मुनी !

## जैन धर्म दिक्षार्थी हर्ष देसरडा हा मराठवाड्यातील सर्वात कमी वयाचा मुनी व त्यांच्या स्वागत समारोहात उपस्थितांचा कंठ दाटून डोळ्यातून आश्रू ओघळले !

प्रतिनिधी @ मानुर

मराठवाड्यातून बहुधा पहिला एकविस वर्षिय युवा जैन धर्माची दिक्षा घेत असुन गुरूवार दि०१ मे २०२५ रोजी मोठ्या उत्साहात भव्य शोभा यात्रा काढून दिक्षा पुर्व स्वागत समारोह कार्यक्रम शिरूर कासार येथे संपन्न झाला. यावेळी संपुर्ण महाराष्ट्रातून जैन बांधवांसह शिरूर पंचक्रोशितील धर्मानुरागी उपस्थित होते. कार्यक्रमात आई-वडील, आजी-आजोबा,चुलते-चुलती व भाऊ असा संपूर्ण देसरडा परिवार अत्यंत भावूक झाला. एकविस वर्षीय हर्ष सर्व सुखाचा त्याग करून अत्यंत खडतर तपसाधनेसाठी धर्माच्या मुमुक्षू वाटेवरून मार्गस्थ होत असतांना मात्र उपस्थितांचा कंठ दाटून नेत्रातून न कळतपणे अश्रू ओघळून गेले .

निवासस्थानापासुन ही शाही मिरवणूक आयडीएल इंग्लिश स्कूल च्या भव्य प्रांगणात आल्यानंतर सर्वांनी देसरडा परिवाराचे धन्यवाद व्यक्त केले.या दिक्षा विदाई सोहळ्यास आलेल्या सर्वांचे स्वागत आणि सुरूची भोजन व्यवस्था करण्यात आली होती .व्यापार ,सामाजीक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या या परिवाराचे मोठे योगदान असुन विद्यमान नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा श्वेता प्रकाश देसरडा यांचा लाडला हर्ष हा सर्व श्रीमंती व सुख सुविधाला झुगारून अत्यंत खडतर मार्गावरून बुधवार दि ०७ मे २०२५ रोजी धुळे येथे जैन मुनींच्या सानिध्यात जैन मुनीची दिक्षा घेणार आहे. त्यानिमित्ताने शिरूर शहरात भव्य स्वागत समारोह आयोजीत केला होता .

जैन धर्मिय बांधवाकडून हर्ष चे जसे स्वागत झाले तसे शिरूर नगरपंचायतचे वतीने मा.नगराध्यक्ष





रोहिदास पाटील व सर्व नगरसेवक यांनी देखील स्वागत केले.वारणी ग्रामपंचायत चे ज्ञानदेव केदार ,बाबुराव केदार ,राक्षसभुवनचे कल्याण तांबे ,दादासाहेब खोले ,मा जि प.सदस्य शिवाजी पवार , समस्त पत्रकार संघ आदिंनी हर्ष देसरडा याचे स्वागत केले .

धर्मानुसार चला !

स्वागत समारैहानंतर मुमुक्षू हर्ष देसरडा यानी सर्वांचा निरोप घेतांना आपापल्या धर्मानुसार वागा ,धर्माचे आचरण करून मिळालेल्या अनमोल देहाचे सार्थक करा असा संदेश दिला .आजोबा कांतिलालजी देसरडा ,वडील प्रकाश देसरडा चुलते किरण देसरडा व हर्षचे भाऊ यावेळी भावूक झाल्याचे दृष्य सर्वाच्या डोळ्यात अश्रू ढाळायला लावणारेच ठरले .महिला भगिनीची मोठी उपस्थिती होती .

शिरूरने चार जैन धर्माला दिले चार अनमोल रत्न !

आजवर शिरूरमधून लुनावत कुटूंबातील दोन मुली ,बाफना परिवारातील एक तर ललवानी कुटूंबाची नात अशा चार मुलींनी दिक्षा घेतली आहे , प्रथमच एकविस वर्षीय हर्षने मुलामधून प्रथमच जैन दिक्षा घेऊन शिरूरच्या नाव लौकिकात भर घातली आहे .

शिरूर कासार येथील देसरडा परिवारातील नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा श्वेता प्रकाश देसरडा यांनी दोन मुलांपैकी एक मुलगा धर्मकार्यासाठी सुपूर्द केला. प्रत्येक मात्यापित्यांची इच्छा असते की आपल्या मुलाने संसारामध्ये चांगला संसार योग्य पद्धतीने करावा परंतु श्री प्रकाश देसरडा व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ श्वेता देसरडा या मातापित्यांनी आपला अपत्यास हा भौतिक गोष्टीमध्ये न ठेवता परमार्थामध्ये सर्वोच्च पदासाठी मुलाला दान केले. येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या अपत्याकडून जैन धर्मीय मार्गदर्शन व जैन धर्मांचे प्रचार आणि प्रसार कार्य योग्य पद्धतीने होणार आहे असा विश्वास चिरंजीव हर्ष यांच्या मातापित्यांना आहे. अनेक स्तरांतून शुभेच्छा वर्षाव होताना दिसत आहे.

# सारथी संस्थेच्या थकीत फेलोशिप साठी २०२२ संशोधक विद्यार्थ्यांनि दिले आ सुरेश धस यांना निवेदन

प्रतिनिधी @ मानुर

एकीकडे सारथीच्या १७ विद्यार्थ्यांनी यूपीएससी परीक्षेत यश मिळवल्यामुळे सारथीचे कौतुक होत आहे. तर दुसरीकडे सारथीच्या उडचछठऋ-२०२२ च्या संशोधक विद्यार्थ्यांना जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीतील अधीछात्रवृत्ति म्हणजेच फेलोशिप अद्याप ही मिळालेली नाहीये. तसेच एक वर्षाचा (जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४) घरभाडे भत्ता (क्ठ-) व अकस्मात निधी (उेपींशसशपलू) अजूनही मिळालेला नाहीये. त्यामुळे सध्या २०२२ च्या बॅचचे सर्व झहऊचे सर्व मराठा सारथी संशोधक विद्यार्थी प्रचंड अडचणीत सापडले आहेत. एकीकडे केंद्र तसेच राज्य सरकार सर्व समाजामधील संशोधक विद्यार्थ्यांमध्ये सामानतेचे धोरण आणण्याचा प्रयत्न करतोय असं म्हणताय आणि दुसरीकडे सरकार बार्टी आणि महाज्योती च्या विद्यार्थ्यांना तात्काळ फेलोशिप मिळवून देते पण जेव्हा मराठा समाजासाठी नेहमी हेच सरकार सापत्न वागणूक का देते? सारथीने तसेच सरकारने सर्व विद्यार्थ्यांना समान पातळीवर न्याय द्यावा अशी विनवणी नेहमी सारथी संशोधक विद्यार्थी करतायेत.

मराठा, कुणबी संशोधक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात टाकणाऱ्या सरकारला आज जाब विचारण्याची गरज आहे! सारथी च्या योजनांच्या माध्यमातून उच्च शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्याचा दावा करणाऱ्या सरकारने या योजनांची अंमलबजावणी का नीट केलेली नाही. मागील एक वर्षापासून फेलोशिप मिळत नाही म्हणून विद्यार्थ्यांचे करियर धोक्यात आले आहे, अशी तक्रार अनेक विद्यार्थी करत आहेत. पुस्तके, साहित्य, बाहेरगावी राहण्याचा आणि प्रवासाचा खर्च विद्यार्थ्यांना स्वतःच्या खिशातून करावा लागतोय. फेलोशिपसाठी अट आहे की नोकरी करायची नाही, मग संशोधनासाठी पैसे कोण देणार? परदेशात उच्च शिक्षणासाठी फेलोशिप मिळण्यास १० महिन्यांहून अधिक विलंब झाला, यामुळे अनेकांनी आपले शिक्षण पुढे ढकलले किंवा सोडून दिले याला जबाबदार कोण? असा प्रश्न सकल मराठा संशोधक विद्यार्थी विचारत आहेत.



या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन लोकप्रिय दमदार भाजपा आमदार सुरेश अण्णा धस यांची भेट घेतली आणि निवेदन दिले. या निवेदनाची तातडीने दखल घेत हा विषय आमदार सुरेश आण्णा धस यांनी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे मांडणार असल्याचा यावेळी शब्द दिला. प्रसंगी सारथी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कोल्हे साहेब यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याचे देखील आश्वासन सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी दिले आहे.

या बैठकीत प्रलंबित फेलोशिप निधी तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी योग्य पावले उचलली जातील. विद्यार्थ्यांच्या कार्यात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस हे कटिबद्ध असणार आहेत असा शब्द निवेदन देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला..

# वसुंधरा संवर्धन व जल व्यवस्थापन अंतर्गत जनजागृती रॅली

## समस्त महाजन ट्रस्ट व बारसवाडा जि.प.शाळा,ग्रामपंचायतचा सहभाग

प्रतिनिधी @ अंबड

जागतिक वसुंधरा दिन व जल व्यवस्थापन पंधरवाडा या उपक्रमांच्या अनुषंगाने वसुंधरा संवर्धनाचे कार्यक्रम दि.२२ एप्रिल ते १ मे या कालावधीत राबविण्यात येत आहेत.या अनुषंगाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा केंद्र डोणगाव तालुका अंबड जिल्हा जालना,समस्त महाजन ट्रस्ट मुंबई व ग्रामपंचायत कार्यालय बारसवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती रॅलीचे आयोजन (दि.२४) रोजी बारसवाडा येथे करण्यात आले होते.




गल्हाटी प्रकल्प गाळमुक्त करण्यासाठी समस्त महाजन ट्रस्ट मुंबई यांच्याकडून पोकलेन मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.पोकलेन मशीनसाठी फक्त डिझेलचा खर्च शेतकऱ्यांनी करून गाळ काढण्यासाठी पुढाकार घ्यावा व गल्हाटी प्रकल्प गाळमुक्त करावा असे आवाहन यावेळी समस्त महाजन ट्रस्टच्या नुतनदीदी देसाई यांनी यावेळी ग्रामस्थ,शेतकऱ्यांना केले तसेच यावेळी त्यांनी पाण्याचे महत्त्व विशद केले.तत्पुर्वी गावातून जनजागृती रॅली काढण्यात आली.यामध्ये विद्यार्थ्यांनी पाणी आडवा पाणी जिरवा,झाडे लावा झाडे जगवा,जल है तो हम है अशा विविध घोषणा दिल्या.उपक्रमशील शिक्षक श्रीधर यशवंतराव कुलकर्णी यांनी उपस्थितांना जलप्रतिज्ञा दिली.या वेळी बारसवाडा गावचे सरपंच रामेश्वर खंडागळे,उपसरपंच गजानन सावंत,सामाजिक कार्यकर्ते देवानंद चित्राल,मुख्याध्यापक कैलास जाधव,श्रीधर कुलकर्णी,गोकुळ बोबलट,अर्जुन खोंडे,लहू गोल्हार,सुरेखा जाधव,लताबाई मुळे,गीताताई सुळे,संतोष गायकवाड ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.या उपक्रमांचे डोणगावचे केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर यांनी कौतुक केले आहे.



बीड - १.मे महाराष्ट्र दिना निमित्त बीड जिल्ह्यातील कै गोकुळदास बाबुराव कोटूळे अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी सर्व अवयव दान केले. याची दखल घेऊन जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून ०१.मे.२०२५ रोजी सकाळी ८. वाजता पोलीस मुख्यालय मैदान येथे सन्मानित करण्यात आले. या वेळी उद्योग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री इंद्रनिल नाईक साहेब यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बीड जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत डॉक्टर सिविल सर्जन संजय राऊत यांच्या हस्ते कोटूळे परिवारास सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

# आदर्श इंग्लिश स्कूल, जामखेड येथे महाराष्ट्र दिन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या नेत्रदीपक कामगिरीचा गुणगौरव सोहळा आयोजन

प्रतिनिधी @ अंबड

जामखेड तालुका अंबड येथील शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेली आदर्श इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मध्ये एक मे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मंगल देशा, पवित्र देशा,महाराष्ट्र देशा,प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा! मंगलमय वातावरणात ऐतिहासिक महाराष्ट्र दिनानिमित्त आकर्षक सजावट, रांगोळी साकारत महाराष्ट्र गौरव गिताने भारवलेल्या वातावरणात संस्था सचिव सौ.आशा गंगाधर पांढरे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

याप्रसंगी मान्यवर पालक माता भगिनींच्या उपस्थितीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४/२५ मध्ये विशेष प्राविण्य मिळवत नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. मान्यवरांच्या हस्ते पालकांसमवेत विद्यार्थ्यांना मेडल,प्रशस्तीपत्र देत गौरव करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद तर पालकांना



आपल्या पाल्याची कामगिरी व कौतुक सोहळा पाहून अभिमान दिसून आला.

संस्थापक अध्यक्ष डॉ.गंगाधर पांढरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनानुसार गुणगौरव सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करण्यासाठी अमूल्य प्रेरणा मिळेल असे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले तर शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण शैक्षणिक वर्षात आयोजित केलेल्या विविध उपक्रमाचे विशेष कौतुक केले. डॉ. महादेव पांढरे यांच्या विशेष नियोजन नुसार आयोजित महाराष्ट्र दिन सोहळ्याचे प्रस्ताविक पल्लवी भोजने यांनी केले तर आभार प्रदर्शन मोमीन मॅडम यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षिका शिक्षक कार्यालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.



# प्रशासकीय सेवेत निवड व नियुक्त झालेल्या गुणवंतांचा सत्कार समारंभ संपन्न

## गुणवंतांचा सत्कार हा संबोधींनी प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम - श्रावस्ती मेश्राम

प्रतिनिधी @ बीड

शिक्षण ही विकासाची शिदोरी आहे.ज्याने या शिदोरीचा योग्य वापर केला ते आपल्या आयुष्यात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाहीत.आज संबोधिनी सामाजिक प्रतिष्ठानने यशस्वी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून खऱ्या अर्थाने नव्या पिढी समोर आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम यांनी व्यक्त केले.

बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त आणि संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संबोधी सामाजिक प्रतिष्ठानच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता प्रशासकीय सेवेत निवड आणि रुजू झालेल्या गुणवंतांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम लाभल्या. तर जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे, उप नानाभाऊ हजारे(उप शिक्षणाधिकारी) मा. सूरेश साबळे (सेनि.पी.आय.),दैनिक समर्थ राजयोग चे संपादक तथा प्रदेश संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे वैभव स्वामी,कार्यक्रमाचे आयोजक वैशालीताई शिंदे(उजगरे) हे व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. लगभग २० प्रशासकीय सेवेत निवड व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महामानव अभिवादन ग्रुपचे भोले सर,आयु. काशिनाथ वाघमारे व प्रशांत वासनिक यांनी परिश्रम घेतले. सर्वांची सहकार्यातून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# मौजे आष्टी ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचारा विरुद्ध जिल्हा परिषद जालना समोर भगवान वाघमारे यांचे उपोषणाचा तिसरा दिवस

## गेंड्याच्या कातडीचे अधिकारी दखल घेणार का ?

प्रतिनिधी @ जालना

परतूर तालुक्यातील मौजे आष्टी येथील ग्रामपंचायतच्या सरपंच आणि ग्रामसेवक यांनी १५ व्या वित्त आयोग ,घरकुल योजने मध्ये कुठलेही कामे न करता बिले उचलले आहे,एम.आर.जि.एस. अंतर्गत बोगस कामे व घरकुल मधील घराचे बांधता न करता पुर्ण बिले उचलणे अशा विविध कामांच्या नावाखाली लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला गेला.या आर्थिक गैरव्यवहाराबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केलेले असून अद्याप कसल्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही.ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभार व भ्रष्टाचाराच्या कारभाराची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी भगवान रंगनाथ वाघमारे दि.१ मे पासून जिल्हा



परिषदेसमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.मौजे आष्टी येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी संगनमत करून एम.आर.जि.एस.ची कामे अर्धवट करुन संपूर्ण बिल उचलले आहे,लल घरकुल योजनेची कामे न करता घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे घेऊन घर न बांधता बिले उचलण्यात आली. महात्मा ज्योतीबा फुले व्यापारी संकुलनाचे काम अर्धवट असून त्यामधून बिअर बार साठी रस्ता ठेवलेला आहे.तो रस्ता कोणत्या आधारावर देण्यात आला आहे.रमाई घरकुल व लल घरकुल योजनेतील कामाची चौकशी करण्यात यावी एम.आर.जि.एस.मधील अहिल्यादेवी सिंचन विहीरीचे आणि पादंण रस्त्याच्या कामाची चौकशी अशा विविध प्रकारच्या कामाच्या चौकशी करिता विनाकारण राजकीय दबावापोटी विलंब केला जात असल्याने आष्टी येथील ग्रामपंचायतचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार चालू आहे अजूनही लाखो रुपयांचा निधी कुठल्याही प्रकारची कामे न करता फक्त कागदोपत्री काम दाखवून पैसे लाटण्याचे काम आष्टी येथील लोकप्रतिनिधी करत आहेत आणि त्यांना राजकीय मोठ्या नेत्यांचा वरदहस्त असल्याने शासकीय कर्मचारी त्यांच्या दबावाला बळी पडून चौकशीला विनाकारण विलंब करत असून विविध कामे व योजनांमधून लाखो रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याच्या संदर्भात वारंवार तक्रार करूनही कोणतीही चौकशी होत नसल्यामुळे आमरण उपोषणाला बसले असून सरपंच व ग्रामसेवक यांच्या भ्रष्ट कारभाराची सखोल चौकशी करून दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाच्या पैशाचा गैरवापर केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करुन त्यांना निलंबित करावे ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभारामुळे ग्रामसेवक आणि सरपंच संगनमताने केलेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात भगवान रंगनाथ वाघमारे यांनी जिल्हा परिषद जालना समोर उपोषण सुरु केले आहे न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरु राहील

# कंपोस्ट खड्डा भरू आपले गाव स्वच्छ ठेवू -आमदार नारायण कुंचे

प्रतिनिधी @ बदनापुर

बदनापुर तालुक्यातील वरूडी येथे आज आमदार.नारायण कुचे आणि मा.शिरीष बनसोडे (अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जालना)यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये कंपोस्ट खड्डा भरू,आपले गाव स्वच्छ ठेवू या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत वरुडी येथे करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी स्वच्छता,कचरा वर्गीकरण आणि विल्हेवाट इत्यादी चे महत्व सांगितले.यावेळी श्रीम.ज्योती राठोड गट विकास अधिकारी,श्री.वानखेडे विस्तार अधिकारी पंचायत,श्री.तट्टू, विस्तार अधिकारी पंचायत समिती श्रीमती नम्रता मॅडम(शुर्शिीं) , श्री सातपुते (इठउ),सरपंच श्रीमती राधाबाई



शिंदे, उपसरपंच श्रीमती योगिता शिंदे ,ग्रामपंचायत अधिकारी आर बी पवार ,ग्रामपंचायत सदस्य श्रीमती नीता शिंदे, स्वाती शिंदे ,कृष्णा शिंदे ,ओमिद शेख व माजी सरपंच राधाकीसन शिंदे ,हरिश्चंद्रबाबा शिंदे, विष्णू शिंदे, गजेंद्र शिंदे ,पुरुषोत्तम जोशी ,प्रवीण शिंदे ,रामहरी काकडे संतोष शिंदे सुदाम शिंदे राजेंद्र शिंदे अमिन शहा, नसीर शहा व ग्रामस्थ उपस्थित होते.

# तब्बल १७ वर्षांनी पुन्हा भरली शाळा वाकुळणीच्या छत्रपती संभाजी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ बदनापुर

शाळेतील सवंगडी, शाळेचा वर्ग, लाकडी बाक यांची आठवण प्रत्येकाच्या मनात आयुष्यभर घर करून असते. शाळा सोडल्यावर पुन्हा लाकडी बाकांवर बसण्याची इच्छा अनेकांच्या मनात वारंवार येतेच. म्हणूनच छत्रपती संभाजी विद्यालयातील २००७-०८ च्या दहावीच्या बॅचचे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने एकत्र आले होते. तब्बल १७ वर्षांनी जुने सवंगडी पुन्हा भेटल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

छत्रपती संभाजी विद्यालयातील मराठी माध्यमाच्या या बॅचचे माजी विद्यार्थी व्हॉट्सॲप आणि फेसबुकच्या माध्यमातून एकत्र आले. त्यांचा ग्रूप तयार झाला. काही काळातच ग्रूपवर सदस्य वाढत गेले. माजी विद्यार्थ्यांच्या भेटी होऊ लागल्या. गप्पांचे फड रंगू लागले. त्यातूनच सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून रीयुनियन म्हणजेच या बॅचचे स्नेहसंमेलन आयोजित करण्याची योजना पुढे आली आणि या स्नेहमेळाव्याचे आयोजन झाले.

या वेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी वाटचाल कशी झाली. गुरूंच्या आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाने यशस्वी प्रवासाचा टप्पा कसा गाठला, याबाबत मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वसंत नलावडे सर, शिक्षक ढवळे सर, देशमुख सर,चेपटे सर,जिगे सर,अन्नदाते सर,चोरमले सर, सानप सर,

श्रीमती तांबे मॅडम तर विद्यार्थी नकुल काळे,नारायण बोरुडे,बाबासाहेब दाभाडे,दत्ता काळे, कृष्णा काळे,आनंदी तिवारी, किशोर पवार, गणेश वाडेकर, गौतम खिल्लारे,गणेश आरगडे,गंगाधर वाघ,अमोल हुसे,अशोक वाघ,नवनाथ गायके,गणेश वैद्य,ज्ञानेश्वर बोंढारे,दत्ता गोडसे,ज्ञानेश्वर काकडे,

विष्णू कळमकर,सतीश पालवे,प्रतीक्षा दाभाडे,माधुरी बेळगे,ज्योती साळकर,साधना घुगे,सविता नागरे,रुचिता राठी,अंजली नलावडे,राधा काळे,,सत्यवती काळे,अलका काळे,मनीषा वाघ,ललिता बेळगे,सोनाली पठाडे,सविता भालेकर, यांनी देखील मनोगत व्यक्त केले. प्रमुख मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करून सामाजिक जीवनात नेहमी यश संपादन करावे, असा आशीर्वाद दिला. तब्बल १७ वर्षानंतर गुरू व शिष्य एकत्र आल्याने अनेकांना गहिवरून आले होते. भागवत वाघ यांनी प्रास्ताविक केले. तर लक्ष्मण पाष्टे यांनी आभार मानले.

# जि.प.प्रा.शा.दहिफळे वस्ती (मानूर) शिरूर तालुक्यात प्रथम

प्रतिनिधी @ मानुर

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जि.प.प्रा.शाळा दहिफळेवस्ती केंद्र मानूर शिरूर कासार तालुक्यामध्ये प्रथम मानांकनाची ठरली.शैक्षणिक वर्ष सन २०२४ २५ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान दोन टप्प्यात राबवले गेले. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्र सहभागी झाला. शासकीय, निमशासकीय, खाजगी या सर्व व्यवस्थापनाच्या शाळा यामध्ये उत्साहाने सहभागी झाल्या. तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तर या स्तरावर शाळांचे मूल्यांकन करून त्यांना प्रचंड भव्य बक्षीस देत महाराष्ट्र शासनाने सन्मानित करत अत्यंत प्रभावी व सुंदर अभियान राबवत गुणवत्तेसाठी एक आगळावेगळा उपक्रम यशस्वी करून दाखवला. म्हणतात ना प्रशासनानं जर ठरवलं तर अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी या शक्य होऊ शकतात अगदी याच उक्ती प्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण शिक्षण विभाग कामास लागला प्रत्येकाला हा मानाचा सन्मान जिंकण्याची आस निर्माण झाली. मा. मुख्यमंत्री व सर्व प्रशासकीय यंत्रणा यामध्ये सक्रिय झाली, आणि शाळांची तपासण्या सुरू झाल्या. शासन स्तरावरून देण्यात आलेल्या निकषाप्रमाणे जो तो आपल्या शाळेत कार्य करू लागला. नंतर समित्यांची नेमणूक करत प्रत्येक शाळा तपासली गेली व तिचा स्तर निश्चित केला आणि तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त



शाळांचा भव्य पारितोषिक देत सन्मान करण्यात आला. जि. प. प्रा. शाळा दहिफळेवस्ती केंद्र मानूर ही शाळा या अभियानात सक्रियपणे सहभागी झाली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा क्रमांक एक मध्ये शाळेला शिरूर कासार तालुकास्तरीय द्वितीय क्रमांकाचे प्राविण्य मिळविण्यात यश आले. तर टप्पा क्रमांक एक मध्ये शाळेने शिरूर कासार तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे प्राविण्य मिळवत आपला नावलौकिक सार्थ ठरवला. यामुळे तालुक्यातून या शाळेचे कौतुक होत आहे. मा. गटविकास अधिकारी जावळे साहेब यांनी जिल्हा परिषद शाळांचे आलेले उत्कृष्ट अनुभव सर्वांशी शेअर करत शुभेच्छा दिल्या. मा. गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे साहेब यांनी विजेत्या शाळांचे कौतुक करत सहभागी शाळांनाही प्रेरणा दिली. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी जमीर शेख साहेब यांनी शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाने ओळखून कार्य केले पाहिजे असे मत व्यक्त करत विजेत्या व सहभागी शाळांना शुभेच्छा व प्रेरणा देत येणाऱ्या पुढील वेळेसाठी पुन्हा सज्ज राहण्याचे आवाहन करत सर्वांचे कौतुक केले. पंचायत समिती शिरूर कासार नवीन इमारतीमध्ये हा तालुकास्तरीय पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. मानूर केंद्राचे केंद्रप्रमुख कारभारी खेडकर सर यांनी ही मोलाचे मार्गदर्शन या शाळेला केल्याबद्दल मुख्याध्यापक संतोष गरजे यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. मिशन जरेवाडी या उपक्रमा अंतर्गत शिरूर कासार तालुक्यात ज्या शिक्षकांनी व शाळांनी उत्कृष्ट कार्य केले त्यांचेही यावेळी शिरूर कासार तालुका प्रशासनाकडून सन्मान करण्यात आला यामध्येही मु.संतोष गर्जे सर,व्याख्याते कैलास तुपे सर, उपक्रमशील शिक्षिका शितल काळदाते मॅडम,



# दिंद्रुड येथे महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त अभिवादन

प्रतिनिधी @ दिंद्रड

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील मन्मथस्वामी मठात महात्मा बसवेश्वर जयंती काल बुधवारी (दि३०) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी येथील वीरशैव समाजबांधव व गावातील जेष्ठ, प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार, श्रीफळ वाढवून अभिवादन केले.

क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर हे आधुनिक समाजसुधारक म्हणून जगविख्यात आहेत. बसवेश्वरांचा जन्म वैशाख महिन्यात अक्षय्य तृतीयेला झाल्याची अख्यायिका प्रसिद्ध आहे. हिंदू धर्मातील जातिव्यवस्था, अन्य हानिकारक प्रथा व रूढीच्या विरुद्ध संघर्ष केला. तसेच त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. गावातील ग्रामस्थ, वीरशैव बांधवांसह विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी महात्मा बसवेश्वरांना अभिवादन केले.




महाराष्ट्र शासनाचे मुखपत्रअसलेल्या 'लोकराज्य' आणि 'महाराष्ट्र अहेड'च्या वेव्हज् विशेषांकाचे प्रकाशन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये सुरू असलेल्या वेव्हज्- २०२५ या परिषदेत आयोजित या प्रकाशन सोहळ्यास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे सचिव पी. अनबलगन, प्रबंध संपादक तथा संचालक (माहिती) हेमराज बागुल, संचालक (माहिती) तथा वेव्हजविषयक प्रसिद्धीचे समन्वय अधिकारी किशोर गांगुर्डे, संचालक (वृत्त-जनसंपर्क) डॉ. गणेश मुळे, उपसंचालक (वृत्त) श्रीमती वर्षा आंधळे आदी उपस्थित होते.